# श्री. मारोतराव सोमाजी राऊत

सेवक क्र. ७२९ प्लॉट नं. १०८, भुतेश्वर नगर, नागपूर

माझा सत्य अनुभव :

आंभोरा हे गाव भंडारा जिल्ह्यात असून महाशिवरात्रीनिमित्त फेब्रुवारी महिन्यात तेथे महादेवाची यात्रा भरते. सन १९७२ मध्ये बाबांचा दौरा आंभोऱ्याला होता. मी बाबाचा एक सेवक असून कलापथक भजन मंडळाचा तबलजी आहे. मी पण बाबांसोबत दौऱ्यात होतो. पण मी बाबांचा मार्ग स्वीकारला नव्हता. भजनाचे बोलावणे आल्यास मला तबला वाजविण्याचे पैसे द्याल तरच मी भजनाला येईल, अन्यथा येणार नाही असे मी उत्तर देत असे.

आम्ही दुपारी एक वाजता आंभोऱ्याला पोहोचलो. नदीत रेताळ जमीनीवर सेवकांनी तंबु बांधून मुक्काम ठोकला. दुपारी तीन वाजता नाश्ता, चहा वगैरे झाला. मी लोकांकडे(निंदकांमध्ये) जाऊन बसलो होतो. यात्रा खुपच भरली होती. जिकडे–तिकडे तंबु लागले होते. दुकानेसुध्दा अनेक प्रकारची होती. पाहता पाहता सायंकाळ झाली. सुर्य मावळला, अंधार पडला. भजनाची वेळ झाली. आम्ही भजनाच्या तयारीला लागलो पण गॅसबत्ती पेटत नव्हती. काही सेवकांना वाटले, आपल्या गॅसबत्त्या खराब झाल्या असतील म्हणून शेजारच्या तंबुवरील पेटलेल्या गॅसबत्त्या आणल्या. त्यासुध्दा विझून गेल्या. शेवटी पेटवणारा थकून गेला. भजन ऐकणाऱ्यांची खूप गर्दी झाली. ती सारखी वाढू लागली. नामुष्की होण्याची वेळ आली. गॅसबत्ती का पेटत नाही हे लक्षातच येत नव्हते.

तेव्हा बाबा निराकारमध्ये आले. त्यांनी भजन मंडळीला समोर बोलावले आणि म्हटले, ''भजन–मंडळ को बहोत गर्व आया है। कहते है भजन की मजुरी होना। अगर भजन नही हुवा तो मजुरी कहासे मिलेगी?'' बाबांचे बोलणे ऐकून आम्ही बाबांना माफी मागितली.

नंतर विझणाऱ्या सर्वच बत्त्या पेटल्या व भजन झाले.

वरील घटना प्रत्यक्ष पाहूनसुध्दा मी बाबांना व बाबांच्या कार्याला ओळखले नव्हते.

एकदा माझ्यावर फार मोठा दुःखाचा प्रसंग ओढवला. १९७४ मध्ये माझा पहिला मुलगा सहा महिन्यांचा होता. एकदा त्याची प्रकृती जास्तच बिघडली. वैद्यांचा

व डॉक्टरांच्या औषधोपचाराबरोबर मुलगा वाचावा म्हणून अनेक जाणते, मंत्रविद्यावाले यांचेकडून तांद्री हालवून निंबुचे अनेक उतारे काढून, धागे–दोरे बांधून सुध्दा मुलाची प्रकृती बिघडतच गेली. सर्वांना वाटले, त्याचा अन्त्यसमय आला आहे. सर्व त्याला खाली ठेवा असे म्हणू लागले. शेवटी सर्वांच्या म्हणण्याप्रमाणे मुलाला खाली जमिनीवर झोपविले. दुःखामुळे रडणे अनावर झाले. अशा परिस्थितीत मला महानत्यागी बाबा जुमदेवजींच्या निस्वार्थी सेवेची व कार्याची आठवण झाली.

तेव्हा बाबांचा एक सेवक म्हणाला, तबलजीसाहेब मुलाच्या नाकावरचा कापूस हालत आहे. माझी गोष्ट ऐका. तुम्ही सर्व जाणत्याला परत पाठवा व एका तासात तीन वेळा बाबा हनुमानजीला चुकलेल्या कर्माची माफी मागा. दिलेले फळ माझे असेल तर मला द्या, तुमचे असेल तर तुम्ही घेऊन जा पण मला दुःख दाखवू नका. अशी प्रार्थना करा. मी भिंतीजवळ बसून कापूर, अगरबत्ती लावून सांगितल्याप्रमाणे म्हटले, त्यावेळेस रात्रीचे दोन वाजले होते. मुलाच्या प्रकृतीत हळूहळू सुधारणा होऊ लागली. त्यामुळे मनाला आनंद झाला.

दुसरा दिवस उजाडला. तो पूर्ण दिवस आनंदात गेला. सायंकाळ झाली. घरातील सर्व मंडळीनी बाबांचा मार्ग स्वीकारण्याबद्दल एकमत केले. सायंकाळी माझे सासरे जाणत्याला घेऊन आले. जाणता म्हणाला, 'मुलगा तर खेळून राहिला आहे, मी आपल्या घरीच तांद्रीने पाहिले. मला आता एक बाटली दारु पाजा.' मी म्हणालो, ''फक्त चहा व सुपारी घ्या. तुम्ही यापुढे मला काहीच सांगू नका. मी बाबा हनुमानजींचा मार्ग स्वीकारणार आहे.'' यावर जाणता म्हणाला, अहो जावईबुवा, कुठला बाबा हनुमानजी आणला आहे. त्याला एका झटक्यात बांधून देतो. एवढे बोलुन जाणता जबरदस्तीने तांद्री हालवायला बसला. दिव्याने तांद्रीची दोरी जळली जाणता दिवा हाताने उचलायला गेला, तेवढ्यात दिवनाल फुटली. तेव्हा त्याने कुणाला घरी बोलाविले आहे का म्हणून विचारले. मी म्हणालो, मला आणि माझ्या कुटुंबाला बाबांचा सत्य मार्ग स्वीकारायचा आहे.

एकदा ढोलमारा, सातोना या गावी बाबांचा दौरा होता. बाबांसोबत भजनमंडळी आणि परमात्मा एक सेवक नागरिक सहकारी बँकेचे डायरेक्टर्स तसेच परमपूज्य परमात्मा एक सेवक मंडळाचे कार्यकर्ते पण होते. डोलमारा या गावी दुपारी भगवंताच्या गुणांची चर्चा बैठक झाली. रात्रीला भजनाचा कार्यक्रम झाला.

दुसरा दिवस उजाडला. सकाळी उठलो. सर्व मंडळी गावाच्या बाहेर शौचास गेलो असता तुरीच्या शेंगाचे वावर दिसले. तुरीच्या शेंगा पाहून तोंडाला पाणी सुटले. आम्हाला वाटले, बाबा काही पाहायला येत नाही म्हणून दुसऱ्याच्या शेतातल्या खूप तुरीच्या शेंगा खाल्ल्या आणि खिशातही भरुन आणल्या. शेवटी पेटीमास्तर शेंगा खाताना बाबांना दिसले. बाबा त्यांच्याकडे पाहून हसले व समजून गेले.

सायंकाळ झाली. आम्ही बंडी बैलाने सातोन्याला गेलो. रात्रीचे आठ वाजले

होत. भजन जाहीर झाल्यामुळे गावातील बरेच लोक मंडपात गोळा झाले होते. पाहता–पाहता स्टेजसमोर लोकांची गर्दी जमली. भजनमंडळी स्टेजवर चढून वाद्य सजवू लागली. पेटीचे तीन सूर बंद पडले होते. आम्ही खूप प्रयत्न केला पण पेटीचे तीन सूर लागतच नव्हते. तेव्हा बाबा म्हणाले कसं काय मंडळी? भजनाला उशीर का होत आहे? मी म्हणालो, ''बाबा पेटीत ट्यूब लाईटचे किडे गेले आहेत, त्यामुळे पेटीचे तीन सूर लागत नाहीत.''

बाब हसू लागले व म्हणाले, अहो मारोतराव, त्यात किडे वगैरे काही घुसले नाहीत त्यात तुरीच्या शेंगा घुसल्या आहेत. हे उद्‌गार ऐकताक्षणीच आम्ही स्टेजवरुन खाली उतरलो आणि बाबांना दुसऱ्याच्या शेतातील शेंगा चोरुन खाल्ल्याची माफी मागितली. त्याचवेळी पेटी दुरुस्त झाली आणि भजनाचा कार्यक्रम ठरल्याप्रमाणे झाला.

* * * * *